# कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर

श्री शाहू मार्केट यार्ड, कोल्हापूर ४१६ ००५.

(०२३१) (ऑफिस) २६५१४०४,२६५२१२५,२६५०५९० / (सचिव) ,२६५३८५३ / (सभापती) २६५०१३०,
(संगणक विभाग) २६५१७०५


जावक नंबर ८३ / १३-१४ दिनांक :- ८/११/२०१३

## परिपत्रक

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीचे श्री शाहू मार्केट यार्ड या मुख्य बाजार आवारावरील सर्व अडते, दलाल, खरेदीदार, व्यापारी यांना या परिपत्रकाद्वारे कळविणेत येते की,

शेतकऱ्याचा कोणत्याही प्रकारचा शेतीमाल खरेदी-विक्री करताना नियमांनुसार १००% वजनमाप होणे कायद्याने बंधनकारक आहे. तसेच, सदरचे वजनकाटे हे शासनाकडून योग्यरित्या प्रमाणित करुन सील केलेले असले पाहिजेत.

तरी सर्व व्यावसायिक घटकांनी याकामी योग्य ती दक्षता घेवून स्वमालकीचे प्रमाणित केले इलेक्ट्रॉनिक वजनकाटे शेतीमालाचे व्यवसाय करणेचे ठिकाणी ठेवणेचे आहेत. वरीलकामी या समितीस सोबत जोडले नमुन्याप्रमाणे आपलेकडे उपलब्ध इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यांबाबतचा तपशील या कार्यालयास शुक्रवार दि. १५/११/२०१३ इ. पूर्वी सादर करावा. मुदतीत प्रमाणित न केलेले इलेक्ट्रॉनिक वजनकाटे वापरात असलेचे निदर्शनास आलेस व्यवसायाचा परवाना तात्काळ निलंबीत करणेत येईल व योग्य ती कायदेशीर कार्यवाही केली जाईल याची नोंद घेणेत यावी.

प्रशासक,
कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती,
कोल्हापूर

प्रतिलिपी :-

माहिती व नमुन्यातील तपशीलामध्ये माहिती मुदतीत तात्काळ उपलब्ध करुन घेणे व सदरची माहिती संकलित करुन त्रुटीबाबत समिती कार्यालयास रिपोर्ट करणेबाबत...

१) विभागप्रमुख, गुळ व शेंग विभाग
२) विभागप्रमुख, कांदा व बटाटा विभाग
३) विभागप्रमुख, फळे व भाजीपाला विभाग
४) विभागप्रमुख, धान्ये व कडधान्ये विभाग
५) विभागप्रमुख, तोलाई विभाग